रयत शिक्षण संथेचे,

अण्णासाहेव आवटे महाविद्यालय, मंचर

मराठी विभाग

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

अहवाल - २०२३-२४

रयत शिक्षण संस्थेचे, अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** दि.१४ जानेवारी २०२४ ते २८ जानेवारी २०२४ या काळात साजरा करण्यात आला. या कालावधीमध्ये विभागाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयात पुढील स्पर्धांचे आयोजन केले होते.

अ.क्र.	स्पर्धेचे नाव	सहभागी विद्यार्थी
१.	**काव्यलेखन स्पर्धा**	२७
२.	**प्रश्न मंजुषा**	२१०
३.	**निबंधलेखन स्पर्धा (निबंधाचे विषय खालीलप्रमाणे)**	५९
४.	**काव्यसंमेलन**	९२

निबंधाचे विषय :

१. सोशल मीडिया आणि मराठी भाषा
२. मी वाचलेले पुस्तक
३. मायबोली मराठी
४. पाणी हेच जीवन

या स्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढून विजेत्यांना २७ फेब्रुवारी या 'जागतिक मराठी भाषा दिनी' प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे.

दि. २८ जानेवारी, २०२४ रोजी मराठी विभाग व मराठी साहित्य परिषद, मंचर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात **'काव्यसंमेलना'चे** योजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित कवी म्हणून श्री विठ्ठल महामुनी, श्री ज्ञानेश्वर धुमाळ, श्री. शकील जाफरी, श्री. रूपा बेंडे, श्री. दत्ताजी पायमोडे आदी कवी उपस्थित होते. या सर्वांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. तसेच याप्रसंगी महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी स्वलिखित तर काही विद्यार्थ्यांनी इतरांच्या कवितांचे सादरीकरण केले.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड होते. या काव्यसंमेलनाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.बी.पी.गार्डी यांनी केले.

गेले. या काव्यसंमेलनात एकूण १५० विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्यने सहभागी झाले होते.



काव्यसंमेलनाचे प्रास्ताविक करताना मराठी विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.बी.पी.गार्डी



निमंत्रित कवि मा. श्री. विठ्ठल महामुनी आपली कविता सादर करताना



कवि श्री. दत्ताजी पायमोडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



काव्यसंमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाडसाहेब आपले मनोगत व्यक्त करताना





काव्यसंमेलनात विद्यार्थी आपल्या कवितांचे वाचन करताना

लोकमत

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात 'भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

मंचर : येथील रयत शिक्षण संस्थेचे,अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,मंचर येथे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' सप्ताह साजरा करण्यात आला.

काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी निमंत्रित कवी ज्ञानेश्वर धुमाळ, शकील जाफरी, रूपा बेडे, विठ्ठल महामुनी, दत्ताजी पायमोडे मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध कवी प्रा. संतोष पवार यांनी कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी होऊन कविता सादर केली. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ नानासाहेब गायकवाड उपस्थित होते. प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड म्हणाले, मराठी भाषेला समृद्ध वारसा आहे. संत ज्ञानेश्वरापासून ते कवी ग. दि. माडगुळकरांपर्यंतच्या सर्व कवींनी तर आताचे नवोदित कवीपर्यंत आपल्या काव्यलेखनाने मराठी कविता व मराठी साहित्य, भाषा समृद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. तो भाषेचा समृद्ध ठेवा आजच्या नवीन पिढीने जतन करण्यासाठी, अधिक साहित्यचे वाचन करावे. असा विश्वास व्यक्त केला. या काव्यसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थिनी अर्चिता गायकवाड, प्रतीक्षा साबळे, संगीता वळसे, मीताली मंडले, तृप्ती बांगर, कार्तिकी पोखरकर या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे काव्यवाचन करून आपला सहभाग नोंदविला. स्वागत मराठी विभागप्रमुख बाळासाहेब गार्डी यांनी केले तर आभार प्रा. राधाकिसन मुठे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एस. एस. रूपनर यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 31, 2024
Powered by: erelego.com